वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि. २१ मार्च २०२५ पाने ४ किंमत ३

# मी सर्वांच्या वतीने सांगतो की, कोणताही मुलसमान मुघलांशी आपला संबंध जोडत नाही

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता



## आमचं काहीही देणं-घेणं नाही- माजी खा.इम्तियाज जलील

औरंगाबाद, (दिव्य न्युज):- गेल्या काही दिवसांपासून राज्यात विविध विषय गाजत आहेत. सुरुवातीला महाराष्ट्रातील गुन्हेगारीचे वाढलेले प्रमाण हा विषय चर्चेत होता. त्यानंतर औरंगजेबाची कबर आणि इतर घटना घडल्या. तशातच नागपुरात रात्रीच्या वेळी दोन गटात राडा झाला. यावरून अनेक घटना घडल्या. तेव्हापासून या घटनांचे तीव्र पडसाद उमटले. त्यानंतर आज दंगल ते औरंगजेब या विविध विषयांवर एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी याबाबत आपले मत व्यक्त केले.

महाराष्ट्रातील पत्रकारांनी बाहेरच्या प्रगत देशांमध्ये जाऊन तेथील पत्रकारिता बघावी, त्यातून काहीतरी शिकावे. त्या लोकांना प्रगती व विकासाचे वार्तांकन करायची इच्छा असते. पण आपल्या महाराष्ट्रात लोकांचा असा विचार असतो की, ४०० वर्षांपूर्वी काय झालं होतं? त्यांनी किती क्रूरता केली याचा हिशेब इम्तियाज जलीलकडून कसा काय घेतला जाऊ शकतो. मी इतिहासकार किंवा रिसर्च स्कॉलर नाही. मला असे प्रश्न विचारले जातात तेव्हा वाईट वाटते. कारण मी खासदार होतो, आमदार होतो पण तुम्ही मला मुसलमानांचा नेता म्हणून प्रश्न विचारता. मी सगळ्यांचा आमदार - खासदार होतो, एका विशिष्ट जातीधर्माचा लोकप्रतिनीधी नव्हतो. जेव्हा मला केवळ मुस्लीम या नात्याने काहीतरी विचारले जाते, तेव्हा मी सर्वांना देशाच्या मुसलमानांच्या वतीने सांगू इच्छितो की, कोणताही मुलसमान आपला संबंध मुघलांशी जोडत नाही. मी पण जोडत नाही. आमचं काहीही देणं-घेणं नाही, असे इम्तियाज जलील ▸▸ पान २ वर

# गोहत्येचा गुन्हा वारंवार करणाऱ्यांवर मकोका

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विधानसभेत इशारा



मुंबई, (दिव्य न्युज):- गोहत्येचा गुन्हा वारंवार केल्या जातत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्यांवर यापुढे संघटित गुन्हेगारी कायद्यानुसार (मकोका) कारवाई करण्यात येईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत एका लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिला.

अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांनी श्रीगोंदा येथील कायदा सुव्यवस्थेबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. गो तस्करीचे प्रमाण वाढत चालल्याने हे प्रकार रोखण्यासाठी वेगळा कायदा करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. या मागणीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी मकोका कारवाई करण्याचा इशारा दिला.तत्पूर्वी, या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे २ नोव्हेंबर २०२४ रोजी दोन ▸▸ पान २ वर

# गेट परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना १० टक्के अतिरिक्त गुण देणे असंवैधानीक

## मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचा महत्त्वपूर्ण निर्णय

बीड , (दिव्य न्युज):- मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने एका महत्त्वपूर्ण निर्णयात, भरती प्रक्रीयेत गेट परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना दहा टक्के अतिरिक्त गुण देणे हे मनमाणीकारक, अवाजवी आणि असंवैधानीक असल्याचे घोषीत केले आहे. दरम्यान सदर निर्णयास गेट परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या याचिकाकर्ता नितीन राठोड व इतर उमेदवारांनी अ‍ॅड. सय्यद तौसिफ यासीन यांच्या मार्फत उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यात अ‍ॅड. सय्यद तौसिफ यांनी केलेल्या युक्तीवादावर न्यायालयाने हा निर्णय दिला.

याबाबत अधिक माहिती अशी की, महावितरण कंपनीने जाहिरातीद्वारे राज्यात पदवीधर अभियंता प्रशिक्षणार्थी (वितरण) या ३२० पदांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिध्द केली, उमेदवारांची



निवड स्पर्धा परिक्षेद्वारे होणार होती, परंतु कंपनीने जाहिरातीत शुध्दीपत्रकाद्वारे गेट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना ▸▸ पान २ वर

# बीड मतदारसंघातील प्रश्न आ. संदीप क्षीरसागरांनी सभागृहात गाजवले



## ग्रामीण भागातील थांबलेली कामे, बीड शहराचा पाणीपुरवठा आदी महत्वाचे प्रश्न मार्गी लावण्याची केली मागणी

मुंबई , (दिव्य न्युज):-बीड मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडून आ.संदीप क्षीरसागरांनी गुरूवारी (दि.२०) रोजी सभागृहाचे लक्ष वेधले. मतदारसंघात विकासकामांना मिळालेला निधी कोविड काळात वळविल्याने रखडलेली कामे, ग्रामीण भागातील शाळांची दुरूस्ती करणे तसेच विविध सोयी-सुविधा उपलब्ध करणे, रस्ते दुरुस्ती, पुल दुरूस्ती करणे आदी मुद्दे आ.क्षीरसागरांनी अधिवेशनात गाजवले.

बीड मतदारसंघात असलेले श्री क्षेत्र कपीलधार देवस्थान हे संपूर्ण महाराष्ट्रातील ▸▸ पान २ वर



यामुळे व्यक्त होण्याची घाई करायची नसते .. राजकारणात पूर्णवेळ काहीच नसतं.. उगाच सोशल मिडियांमध्ये एकमेकांच्या अंगावर जाऊन भांडून आपले संबंध खराब करून घेऊ नका.. बघा बरं.. बीडचे आजी माजी दोन्ही खासदार आज दिल्लीत एकाच फोटोत आहेत अन् हा फोटो शेयर केला आहे बारामतीच्या खासदारांनी.. त्यामुळं नेत्यांच्या प्रेमापोटी पराकोटीला जाऊन आपल्या एकमेकांच्या दैनदिन आयुष्यात लय वाद करून बसू नका.. काल ताई बीडच्या खासदार होत्या .. आज बाप्पा आहेत उद्या यांपैकी एक कुणी असेल अन्यथा तुमच्या आमच्यातील कुणी असेल.. म्हणून आपापसात लय वाद राजकारणामुळे घालण्यात अर्थ नाही बघा या ठिकाणी...

एका व्यक्तीचे मनोभावे मत...

# २७ वर्षाच्या नात्याला लिव्ह इन रिलेशनशिप म्हणता येणार नाही

## करूणा शर्माच्या वकिलाचा कोर्टात युक्तीवाद



मुंबई , (दिव्य न्युज):- माजी मंत्री धनंजय मुंडे आणि करुणा शर्मा यांच्या पोटगी प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. आज या प्रकरणातील सुनावणी झाली. दरम्यान, २९ मार्चपर्यंत ही सुनावणी तहकूब करण्यात आली आहे. धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी वेळ मागून घेतल्याने सुनावणी तहकूब केली आहे. दरम्यान, करुणा शर्मा यांच्या वकिलांनी आज कोर्टात कोणते युक्तिवाद केले याची माहिती दिली.

करुणा शर्मा यांचे वकील म्हणाले, आजच्या सुनावणीवेळी मुंडे यांनी लग्न केलेले नाही. त्यांचं म्हणणे लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये होतो असा त्यांनी युक्तिवाद ▸▸ पान २ वर

## नागपुर मध्ये ७ कायदे ५७ कलमां अंतर्गत एफआयआर दाखल

# चार अल्पवयीन मुलांसहित एकूण ५१ मुस्लिम युवकांवर गुन्हा दाखल

नागपुर , (दिव्य न्युज):- आंदोलन बजरंग दल आणि तक्ष ने केले आणि धार्मिक भावना दुखवणारे कृत्य करून दंगल भडकली पण करवाई काय झाली? अल्पसंख्याक मोर्चाचे जाफर आणि बजरंग दलाचे नागपूर अध्यक्ष यांच्यातील संवाद झालेला सोशल माध्यमात वायरल होत आहे. त्यांच्या बोलण्यातून स्पष्ट जाणवत आहे की चूक झालेली आहे हे लक्षात आलं आहे. जर त्यांनी माफी मागितली असती तर जमाव प्रक्षुब्ध झाला असता का?

जमाव प्रक्षुब्ध केव्हा होतो जेव्हा समोरची व्यवस्था हि आपल्याला न्याय मिळवून देणारी नाही जिच्याकडे आपण न्याय मागतो तेव्हा जमाव प्रक्षुब्ध होतो. ज्यावेळी जमावाची न्याय मागणी डावलून त्याला खलनायक करायचा असतो तेव्हा प्रशासनाकडून आरोप लावले जातात.उदा. शासकीय कर्मचारी मारहाण, महिला कर्मचारी मार ▸▸ पान २ वर शब्दात

# सुशिला मोराळेंना पतीशोक

## डॉ.पाखरे यांचे दुःखद निधन



बीड, (दिव्य न्युज):- बीड शहरातील राजकरणात अग्रेसर असलेल्या प्रा.सुशिला मोराळे यांचे पती डॉ.हिराजी दत्तोबा पाखरे यांचे आज दुपारी निधन झाले. ते बीड जिल्ह्यातील नामवंत नेत्र रोग तज्ञ होते. त्यांच्या जाण्याने तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. मोराळे व पाखरे कुटूंबियांच्या दुःखात दै.दिव्य वार्ता परिवार सहभागी आहे.


# बीडच्या जाळपोळीत ११ कोटींचे नुकसान;भरपाई कधी मिळणार?

## १६ महिने उलटल्यानंतरही काहीच कार्यवाही नाही, नागपूरमधील जाळपोळीच्या घटनेने बीडच्या प्रकरणाची आठवण

बीड, (दिव्य न्युज):- मराठा आरक्षणावरून बीड जिल्ह्यातील आमदार, माजी मंत्र्यांसह अनेकांची घरे, कार्यालये पेटविण्यात आली होती. शासकीय कार्यालयेही जाळली होती. यात पोलिसांनी केलेल्या पंचनाम्यात ११ कोटींचे नुकसान झाल्याचे उघड झाले होते. या घटनेला १६ महिने १८ दिवस झाले, तरी अद्यापही यातील भरपाईसंदर्भात शासनाकडून काहीच उपाययोजना नाहीत. नागपूरच्या घटनेने जाळपोळीची आठवण



बीडकरांना झाली आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू होते. त्यासंदर्भात ३० ऑक्टोबर २०२३ रोजी बीड बंदची हाक दिली होती. परंतु, या बंदला माजलगावातून हिंसक वळण मिळाले. माजलगावचे राष्ट्रवादीचे आ. प्रकाश सोळंके यांचे घर पेटविले. हे लोण नंतर बीड शहरात आले. चार वाजता ▸▸ पान २ वर



### आरोपींच्या मालमत्तांवर बोजा चढवण्याचे आश्वासन

जाळपोळीनंतर पोलिसांनी पंचनामा केला. तसेच, याची नुकसानभरपाई ही आरोपींकडूनच केली जाणार आहे, असे सांगत त्यांच्या मालमत्तांवर बोजा टाकणार, असे पोलिसांनी सांगितले होते. परंतु, त्यानंतर आजपर्यंत त्यावर काय कार्यवाही केली, हे पोलिसांनी सांगितले नाही. पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांना संपर्क झाला नाही. ते विशेष पोलिस महानिरीक्षक यांच्या वार्षिक तपासणी दौऱ्यात व्यस्त असल्याचे सांगण्यात आले.

### ६५ गुन्हे, ३०० पेक्षा जास्त आरोपी

पोलिसांनी जिल्हाभरात २३ गंभीरसह ६५ गुन्हे दाखल केले. यात जमावबंदीच्या आदेशाचे उल्लंघन, जाळपोळ, जिवे मारण्याचा प्रयत्न, हल्ला, दगडफेक, दंगा करणे, घडवून आणणे, रस्ता अडविणे, विनापरवागनी आंदोलन करणे यांचा समावेश होता. यात पोलिसांनी जवळपास ३०० आरोपींना अटकही केली होती.

### वाहनांसह हॉटेल्सही जाळले

या जाळपोळीत १६ चार चाकी, १२ दुचाकी वाहनांसह हॉटेल्स, नगरपालिका, पंचायत समिती, खासगी बँका आदींची कार्यालयेही जाळण्यात आली होती. तसेच, दगडफेक करून बस, नाट्यगृहांसह खासगी मालमत्तांचे नुकसान करण्यात आले होते.

दिव्य वार्ता



# माँसाहेब जिजाऊ मल्टीस्टेटच्या ३१ मालमत्तांवर चढणार बोजा!

## एमपीआयडी कायद्यानुसार बबन शिंदेसह कुटूंबीयाकडून प्रॉपर्टी खरेदी करणारे अडचणीत

## ज्ञानराधापाठोपाठ जिजाऊ मल्टीस्टेटच्या ठेवीदारांनाही पैसे मिळण्याच्या आशा पल्लवीत

**बीड, (दिव्य न्युज):–माँसाहेब जिजाऊ मल्टीस्टेटच्या माध्यमातून सर्वेसर्वा बबन विश्वनाथ शिंदे व इतर संचालक मंडळाने हजारो ठेवीदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी गुन्हे दाखल असून संचालक मंडळ न्यायालयीन कोठडीत आहे. दरम्यान बबन शिंदे याने ठेवीदारांच्या पैशातून मोठ्या प्रमाणात प्रॉपर्टी खरेदी केली होती व ती विक्रीही केली. एमपीआयडी कायद्यानुसार बबन शिंदेसह सर्व संचालक मंडळाच्या व त्यांनी विक्री केलेल्या प्रॉपर्टीवर बोजा टाकण्याचे काम महसूल प्रशासनाकडून सुरु आहे. त्यामुळे प्रॉपर्टी खरेदी करणाऱ्यांची मोठी अडचण निर्माण झाली आहे.**

माँसाहेब जिजाऊ मल्टीस्टेट उभारुन बबन शिंदे याने ग्रामीण भागासह शहरातील अनेकांचा विश्वास संपादन करत अधिकच्या व्याजाचे अमिष दाखवून ठेवी घेतल्या. मात्र ठेवीदारांकडून स्विकारलेल्या ठेवी त्यांना मुदतपूर्तीनंतरही परत न दिल्याने बबन शिंदेला पळून जाण्याची वेळ आली. याप्रकरणी ठेवीदारांच्या तक्रारीवरुन शिवाजीनगर पोलीस ठाणे, नेकनूर पोलीस ठाणे येथे

गुन्हा दाखल करण्यात आला. बबन शिंदे, अनिता शिंदे हे कारागृहात असून इतर संचालक मंडळाला जामीन मिळालेला आहे. ठेवीदारांनी सातत्याने आंदोलन, उपोषण करुन पोलीसांवर दबाव निर्माण केला होता. यामध्ये एमपीआयडी कायद्यानुसार शिंदेसह त्याने विक्री केलेल्या प्रॉपर्टीवर बोजा टाकण्याचे काम सुरु आहे. यासाठी जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना प्रधिकृत केलेले आहे.

### बीड तालुक्यातच सर्वाधिक प्रॉपर्टी

बबन विश्वनाथ शिंदे, अनिता बबन शिंदे, मनिष बबन शिंदे, गणेश दत्तोबा रसाळ, गुलाब तारासिंग अजदे, अश्विनी सुनिल वांढरे, सुनिल पांडूरंग वाढरे यांच्या नावे बीड तालुक्यातील वासनवाडी येथील सर्व्हे नंबर १५० मधील १ हेक्टर ७० आर व सर्व्हे नंबर १४९, १४८, १५०, १५१, १५७, काही फ्लॉट, कसबे बीड तरफ सर्व्हे नंबर ७९, १४२, मौजे बीड पिंगळे सर्व्हे नंबर १५३, १५५, ६५, १४२, तिप्पटयाही येथील सर्व्हे नंबर ११२ मधील ९ गुंठे व इतर फ्लॉट, बहिरवाडी सर्व्हे ३२ १/१ मधील फ्लॉटसह इतर फ्लॉट, आदर्श नगर सर्व्हे नंबर ६५, पालवण या ठिकाणच्या प्रॉपर्टीवर बोजा टाकण्यात येणार आहे.

### बुडालेल्या बँकेत शिंदेची खाते

बबन शिंदेसह कुटूंबीयाचे अनेक बँकेत खाते आहेत. यामध्ये ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम अर्बन मल्टीस्टेट या बुडालेल्या बँकासह प्रियदर्शनी महिला नागरी सहकारी बैंक, छत्रपती राजर्षी शाहू अर्बन, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बैंक, बैंक ऑफ महाराष्ट्, ॲक्सीस बँक यासह इतर बँकेत खाते आहेत. तसेच एमजी हेक्टर (एमएच–२३, एएस–९७६७) ही कार व १२२६ ग्रॅम सोन्याची दागिने जप्त केलेली आहेत.

### जमीन खरेदी करणाऱ्यांची गोची

विपिन प्रेमचंद लोढा, वैभव ज्ञानोबा जगदाळे, बळीराम बापूराव चव्हाण, धनंजय जनधिन खोड, श्रीकृष्ण हरिदास कदम, सुशील किसनराव वरोडे, साईनाथ बळीराम चव्हाण, सुंदर भाऊसाहेब सुपेकर, संतोष श्रीपती जाधव, विशाल बब्रुवान खोड, निकिता विशाल खोड, विनोद अण्णासाहेब सिरसट, विशाल जगन्नाथ कोटूळे, अजयकुमार अभिमान बहिर यांनी बबन शिंदे, अनिता शिंदे, मनिष शिंदे, हाडुळे यांच्याकडून जमीन खरेदी केलेली आहे या प्रॉपर्टीवर आता बोजा टाकण्यात येणार आहे.

## ज्ञानराधाची ४२ लाख रूपयांची मालमत्ता जप्त




ठेवीदारांची फसवणूक केल्याच्या प्रकरणात येथील ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसायटीची वाहने, दागिणे व रोख रक्कम अशी एकूण ४२ लाख १७ हजार ४९० रुपयांची मालमत्ता बीड आर्थिक गुन्हे शाखेने जप्त केली आहे. या सर्व प्रकरणात आजपर्यंत दाखल तक्रारी व प्राप्त ठेवीदारांचे अर्ज असे एकूण ७०८ कोटी १९ लाख ९१ हजार ४३७ रुपयांची फसवणूक झाल्याची माहिती बीड आर्थिक गुन्हे शाखेने दिली. ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या बीड जिल्ह्यात २३ शाखा असून मल्टीस्टेटविरूद्ध बीड जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात ७६ गुन्हे दाखल

आहेत. ठेवीदारांनी दिलेल्या फिर्यादीमधील माहितीनुसार, ४७ कोटी ९९ लाख ९२ हजार ३६८ रुपयांचा अपहार झाला आहे. याशिवाय बीड आर्थिक गुन्हे शाखेत ११ हजार ५२७ठेवीदारांनी स्वतःहून तक्रारी व पुरावे देत त्यांची ६६० कोटी १९ लाख ९९ हजार ६९ रुपयांची फसवणूक झाल्याचे म्हटले आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी आर्थिक गुन्हे शाखेचे स्वतंत्र पथक तयार करण्यात आले आहे. दरम्यान दि.१९ रोजी ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसायटीची वाहने, दागिणे व रोख रक्कम अशी एकूण ४२ लाख १७हजार ४९० रुपयांची मालमत्ता बीड आर्थिक गुन्हे शाखेने जप्त केली आहे.

### संचालकांचे २५६ बँक खाते निष्पन्न

आर्थिक गुन्हे शाखेकडून या गुन्ह्यात संचालक मंडळातील व इतर अधिकारी–कर्मचारी यांचे २५६ बैंक खाते निष्पन्न केलेले आहे. त्यापैकी चालू स्थितीत असलेले बैंक खाते ४७ आहेत. त्यापैकी ४४ बैंक खाते फ्रीज केल आहेत. यामध्ये ६९ लाख २८ हजार ६३६ रुपये फ्रीज करण्यात आलेले आहे महाराष्ट्र ठेवीदार वित्तीय संस्थेतील हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ अन्वये पुढील कार्यवाहीसाठी एमपीआयडी प्रस्ताव अपर पोलीस महासंचालकांच्या कार्यालयात पाठवण्यात आला आहे.

# बीड पोलिसांनी ‘जात हटवली’ इतरांचे काय?

पोलिसांच्या वर्दीला लागलेला जातीयवादाचा डाग पुसून काढण्यासाठी बीड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी टाकलेले पाऊल प्रागतिक आणि होरपळून निघालेल्या समाजमनावर आशेची फुंकर घालणारे आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड जिल्ह्यातील सामाजिक आणि राजकीय वातावरण कमालीचे गढूळ बनले आहे. या हत्याकांडातील आरोपी विशिष्ट समाजाचे असल्याने या हत्याकांडाला जातीय रंग देण्याचा प्रयत्न झाला. वास्तविक, सरपंच देशमुख यांची हत्या खंडणीच्या वादातून झाली. त्या निमित्ताने अनेकांनी आपापले राजकीय हिशेब चुकते केले; परंतु ते करत असताना पोलिसांना जातीच्या पिंजऱ्यात उभे केले गेले. अर्थात काही पोलिसांची भूमिका आरोपींना मदत करणारीच होती. त्यांच्यावरील कारवाईतून ते स्पष्टच झाले आहे, पण म्हणून, संपूर्ण पोलिस दलावर जातीयतेचा शिक्का मारणे योग्य कसे?

या घटनेनंतर बीड जिल्ह्यातील प्रशासन आणि पोलिस दलात कोणत्या जातीचे किती अधिकारी आहेत, याच्या याद्या सोशल मीडियातून फिरू लागल्याने एखाद्या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी कोणाला पाठवायचे, असा प्रश्न प्रशासनातील वरिष्ठांपुढे निर्माण झाला. यावर उपाय म्हणून काँवत यांनी आडनावाऐवजी नावाने हाक मारण्याचा प्रघात सुरू केला. पोलिस प्रशासनातील या ’नवनीत प्रद्योगा’ची सध्या राज्यभर चर्चा आहे. कुठलाही नवा विचार अथवा बदल प्रशासनात रुजवत असताना वाद–प्रतिवाद होणारच. त्याप्रमाणे आडनाव काढून टाकण्याच्या या निर्णयावरदेखील उलट–सुलट प्रतिक्रिया उमटल्या. केवळ आडनाव काढल्याने जातीय मानसिकता बदलणार नाही, इथपासून ते पोलिसांनी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावले तर अशा कोणत्याही कृतीची गरज उरणार नाही, इथपर्यंत अनेक प्रकारची मते मांडली गेली. आपल्या निर्णयाने समाजातील जातीयवाद संपुष्टात येईल, असा स्वतः काँवत यांचाही दावा नाही. केवळ पोलिसांच्या युनिफॉर्मवरील नेमप्लेटवरून त्यांच्या जातीची



ओळख पुसली जावी, एवढाच त्यांचा हेतू आहे.

जातीयवाद संपुष्टात आणण्यासाठी आजवर झालेल्या प्रयत्नांना फारसे यश आलेले नाही. उलट, जातीय अस्मिता अधिकच टोकदार बनली. पन्नास वर्षापूर्वी इरावती कर्वे या मानववंशशास्त्रज्ञ विदुषीने भारतीय समाजात रुजलेल्या वर्ण आणि जातव्यवस्थेचे विश्लेषण करताना ’जात ही जैविक नसून ती मानवनिर्मित रचना असल्याचा सिद्धांत मांडला होता. ’शालेय दाखल्यावरून जातीचा उल्लेख काढून टाका’, असा सल्ला काही वर्षांपूर्वी प्रकाश आंबेडकरांनी दिला होता. फक्त ’भारतीय’ असा उल्लेख पुरेसा असल्याचे त्यांचे म्हणणे होते; परंतु परिवर्तनाच्या चळवळीतील समतावादी वगळता कोणीही आंबेडकरांची सूचना गांभीर्याने घेतली नाही.

मराठवाड्यातील जातीय संघर्षाला तर निजामकालीन पार्श्वभूमी आहे. विद्यापीठ नामांतरावरून त्यात पुन्हा ठिणगी पडली. सवर्ण विरुद्ध दलित, असा जातीय संघर्ष झाला. यात ओबीसींच्या तुलनेत मराठा तरुणांची संख्या अधिक होती. नामांतराला झालेला विरोध लक्षात घेऊन शरद पवारांनी नामांतराऐवजी नामविस्तार करून मध्यम मार्ग काढला; परंतु त्याची राजकीय किंमत काँग्रेस पक्षाला आणि पर्यायाने पवारांना चुकवावी लागली. नामांतर आंदोलनानंतर मराठवाड्यातील तरुणांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला. याच कालावधीत संभाजी ब्रिगेड, बजरंग दल यांसारख्या संघटनांचे प्रस्थ वाढले. जेम्स लेन प्रकरणानंतर पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संस्थेवर झालेला हल्ला आणि दादोजी कोंडदेव, राम गणेश गडकरी यांचे पुतळे हटविण्यामागे मराठवाड्यातील तरुण आघाडीवर होते. त्यानंतर परशुरामाची जयंतीही मोठ्या प्रमाणात साजरी होऊ लागली. मराठवाड्यातील जातीय संघर्ष कसा धगधगता राहील, यासाठीच्या प्रयत्नांना राजकीय पाठबळ मिळू लागल्यानंतर तर जातीय संघटनांचे पेव फुटले. त्यांच्यात झुंजी लावण्याचेही प्रयत्न झाले. आताही औरंगजेबाच्या कबरीवरून मराठवाड्यातील वातावरण दूषित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. नैसर्गिक दुष्टचक्रात अडकलेली शेती, रोजगाराच्या संधीचा अभाव, महागडे उच्च शिक्षण, आरक्षणाचा लाभ मिळत नसल्याने शासकीय नोकरीतून डावलले जाणे आणि राजकीय सत्तेला ओबीसी प्रवर्गातून मिळालेल्या आव्हानामुळे बहुजन वर्गात विशेषतः मराठा समाजात मोठी अस्वस्थता आहे. कोपर्डीच्या घटनेनंतर हा समाज एकवटला, रस्त्यावर उतरला. संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाने त्याचीच पुनरावृत्ती झाली, निजाम काळातील हिंदू, विरुद्ध मुस्लीम, नामांतराच्या निमित्ताने झालेला सवर्ण विरुद्ध दलित, जेम्स लेन प्रकरणानंतरचा मराठा विरुद्ध ब्राह्मण असा सुप्त संघर्ष आता सामाजिक आरक्षणाच्या निमित्ताने मराठा विरुद्ध ओबीसींवर येऊन ठेपला आहे. बीडमध्ये त्यास मराठा विरुद्ध वंजारी अशा सत्ता संघर्षाची किनार आहे. त्याची झळ पोलिस दलास बसू नये म्हणून एक ’नवनीत’ पाऊल पुढे पडले आहे. समाजानेदेखील दुसरे पाऊल टाकणे गरजेचे आहे.

पान १ वरून

### मी सर्वांच्या वतीने

एका कार्यक्रमात म्हणाले.

राजा लोकं होते, ते लढले, त्यांच्या समस्या होत्या त्या ४०० वर्षांपूर्वीचा होत्या. त्याचं आता काय करायचं आहे. मला फडणवीसांना विचारायचे आहे की तुम्हाला यातून काय मिळते? तुम्हाला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. जर तुमचीच लोकं तुम्हाला टार्गेट करण्यासाठी असं काही करत असतील तर त्याची गरज नाही. आता कबरीचा विषय काढून काय उपयोग काय? मी इतर धर्मांचा आदर करतो, तुम्ही आमच्या धर्माचा आदर करा. स्टेजवर तर जाऊदे पण विधानसभेत हल्ली चुकीची विधाने केली जात आहेत. ही बाब खूप वाईट आहे, अशा शब्दांत जलील यांनी नाराजी व्यक्त केली.

### गोहत्येचा गुन्हा

समाजामध्ये वाद झाला.

या वादाचे रूपांतर नंतर मारहाणीत झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले. तसेच मारहाणीत जखमी झालेल्यांना पोलिसांनी रुग्णालयात दाखल केले. दुर्दैवाने अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात दाखल केलेल्या एका इसमाचा यात मृत्यू झाला. पोलिसांनी यामध्ये कुठल्याही प्रकारची दिरंगाई केल्याचे दिसून येत नाही.या प्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करीत गुन्हेगाराला अटकही केली. मात्र, आरोपीची न्यायालयातून जामिनावर सुटका झाली. श्रीगोंदा शहरातील प्रकरणांमध्ये कठी कारवाई करण्यात येऊन कोणालाही सोडण्यात येणार नाही, असेही भोयर यांनी सांगितले.

### बीड मतदारसंघातील

भाविकांचे श्रद्धास्थान आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरून देखील भाविक याठिकाणी येत असतात. कोवीड काळाअगोदर श्री क्षेत्र कपीलधार देवस्थानच्या विकासासाठी १०० कोटी रूपयांचा विकास आराखडा मंजूर झाला होता. परंतु कोवीडच्या महामारी काळापासून याबाबतची कार्यवाही ठप्प झाली. त्यामुळे महाराष्ट्रभरातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री क्षेत्र कपीलधारचा विकास करण्यासाठी शासनाने निधीची तरतूद करावी. यासोबतच बीड मतदारसंघात एकूण ३५० शाळा आहेत, त्या शाळांमधील ५९२ शाळा खोलींची अतिशय दुरावस्था झाली आहे म्हणजे त्या अक्षरशः पडतीला आल्या आहेत. ६३ वस्तीशाळांच्या इमारतींसाठी निधीची गरज आहे. तसेच ग्रामीण भागातील अनेक रस्ते आणि पूल दुरूस्तीला आले आहेत त्यांना मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा ३ मधून मंजूरी देण्यात याव्यात. अनेक ग्रामपंचायत कार्यालयाच्या नवीन इमारतींची मागणी सातत्याने होत आहे. त्यासाठी निधी देण्यात यावा. या महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकून आ.संदीप क्षीरसागर यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

चौकट (अतिमहत्त्वाचे)

विमानतळ होतय ही आनंदाची बाब पण....

बीडमध्ये विमानतळ होणार. या कामासाठी निधीची तरतूद करून याबाबतच्या कार्यवाहीला लवकरच सुरूवात करण्यात येईल अशी घोषणा याच आठवड्यात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार साहेबांनी याचा मनस्वी आनंद आहे. त्याबद्दल ना.अजितदादांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. परंतु बीड शहरात रहिवास करणार्या ३ लाख लोकांना पाण्यावाचून कधीपर्यंत वेठीस धरायचे! योजना आणि पाणी उपलब्ध असतानाही नागरिकांचे हाल कधीपर्यंत होऊ द्यायचे? ३६ कोटी रूपयांची तातडीने तरतूद करून बीड शहराचा मुलभूत प्रश्न देखील प्राधान्याने मार्गी लावला पाहिजे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागरांनी बीड शहराच्या जिव्हाळ्याचा असलेल्या पाणी प्रश्नावर केली. त्यासोबतच बीड येथील एमआयडीसीचा विकास करून बीड जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाचा मार्गही सुकर करावा अशी आग्रही मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी सभागृहात केली.

### गेट परिक्षा उत्तीर्ण

परीक्षेत दहा टक्के अतिरिक्त गुण देण्याचा निर्णय घेतला.

सदर निर्णयास गेट परीक्षा उत्तीर्णन झालेल्या याचिकाकर्ता नितीन राठोड व इतर उमेदवारांनी ॲड. सय्यद तौसिफ यासीन यांच्या मार्फत उच्च न्यायालयात आव्हान दिले. या प्रकरणाची सुनवणी मा. न्यायमूर्ती एस.जी. मेहरे आणि शैलेश पी. ब्रह्मे यांच्या खंडपीठासमोर झाली असता न्यायालयाने याचीकाकर्ता यांच्या बाजुने निकाल देत निष्कर्ष नोंदवीले आहेत. त्यात म्हटले आहे की, गेट परिक्षा पात्र असलेल्या उमेदवारांना अधिक गुण देण्याचा निर्णय अवलंब केल्याने सदर उमेदवार कमी गुण घेऊन सुद्धा याचिकाकर्ता सारख्या उमेदवारांवर मात करत निवड होतील. यामुळे स्पर्धा परिक्षेतील निवड गुणवत्तेच्या आधारावर करण्याचा निकष पराभुत होईल. जे संविधानाच्या अनुच्छेद १४ आणि १६ अंतर्गत हमी दिलेल्या समानतेच्या मुलभूत अधिकारांच्या उल्लंघन करणारे आहे. भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रतिभावान कर्मचारी वर्ग नियुक्त करणे हे फक्त ऋ-ढए स्कोअर असलेल्या उमेदवारांच्या निवडीद्वारेच साध्य होऊ शकते असे म्हणता येणार नाही. निवड प्रक्रियाचा भाग म्हणुन उमेदवारांची लेखी चाचणी घेण्यात आली जी त्यांची प्रतिभा व सक्षमता शोधण्यासाठी पुरेशी आहे. विशिष्ट प्रवर्ग च्या उमेदवारांना निवड प्रक्रियेत अधिक गुण देणे हे सुस्पष्ट पणे भेदभाव कारक असल्याने संविधानाच्या अनुच्छेद १४ आणि १६ चा उल्लंघन करणारे आहेत, म्हणुनच ती अट असंवैधानिक ठरते.

२००५ च्या भरती नियमावलीत दुरुस्ती न करता, सदर नियम लागू करणे हे बेकायदेशीर ठरतात. निवड यादी आधीच प्रसिद्ध झाल्याने, निकालाच्या अंती उच्च न्यायालयाने प्रतिवादी कंपनीच्या कार्यालयाला गेट स्कोअरच्या १०% वेटेजचा लाभ वगळून निवड यादी सुधारित करुन नियुक्ती आदेश ३ आठवड्या मध्ये देण्याचे स्पष्ट निर्देश दिले आणि रिट याचिका मंजूर केली. याचिकाकर्त्यांच्या वतीने ड. सय्यद तौसिफ यासीन यांनी काम पाहिले.

### चार अल्पवयीन

कर्मचारी मारहाण इ ( राज्यात झालेल्या आंदोलनाची उदाहरणे घ्या अंतरवली सराटी प्रकरण, बीड मोर्चा, सातारा मोर्चा, परभणी प्रकरण)पण प्रशासनाने वेळीच गुन्हा दाखल केल्यानंतर कारवाई करून आरोपींची धिंड काढून दुपारीच निवेदन दिले असते तर जमाव प्रक्षुब्ध झाला असता का?गेल्या पंधरा दिवसातील वातावरण पाहता हे गृहमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या कारकिर्दीला काळा डाग लावणारे आहे. गेल्या आठवड्यात साखर वेल्हा येथे असाच प्रकार झाला गावाने मिळून समजुतदार भूमिका घेतली आणि अनर्थ टाळला. पण अशा छोट्या मोठ्या प्रकरणात शिंदेसेनाचे कार्यकर्ते खूप उत्साही असल्याचे दिसून येतात. याला कारण देवेंद्र फडवणीस आणि शिंदे यांच्यातील सुप्त राजकीय संघर्ष तर नाही ना?

याची सुप्त प्रचिती नागपूरच्या दंगलीतून येते. फडवणीस सारख्या मुरब्बी राजकारण्याच्या होम पीचवर ऐन अधिवेशन काळात दंगल पेटते? हे फडवणीस होऊन देतील का?एकतर दंगल झाल्यानंतर झालेली नाचक्की दूर करण्यासाठी हिंदुत्वाचा अजेंडा मुस्लिमांवर प्रशासनिक कारवाई करून दाखवलाच पाहिजे नाही का?माध्यमे कधी मुस्लिमांची नाहीत आणि नव्हती. माध्यमात एका बाजूच्या प्रतिक्रिया येत आहेत. एका उत्तरभारतीय दुकानदाराची स्क्रिप्टेड टाइप बाईट पाहिली यातून त्यांना जे साध्य करायचं ते करत आहेत.यापूर्वी पारधी समाजाला अपराधी सारखी वागणूक देवून कोणत्याही गुन्ह्यात आरोपी सपडला नाही की एखाद्या पारधी युवकांना टाकून मोकळे व्हायचे. याच पद्धतीने संघ परिवार आणि भाजपा ने मुस्लिम समाजाचे राक्षसीकरण करून समाजास प्रताड़ित करत आहेत. संघ परिवार आणि भाजपा त्यांच्या कपटी व गलिच्छ राजकरणासाठी किती भारतीय मुस्लिम धार्मिय नागरिकांचे बळी देणार? भला माणूस म्हणून गडकरी आणि फडवणीस यांच्या राजकारणाला पाठिंबा देणारा नागपूरचा मुस्लिम समाज हे अनुभवनार आहे.सामाजिक किंवा राजकीय नेतृत्व नाही आणि तथाकथित सेक्युलर पक्ष आपल्या बहुसंख्यक मतांची चिंता करत पीडितांसाठी आवाज उठवाणे लांबच जवळही येवून उभे राहण्यास ही मागे पुढे करतात. आणि अप्रत्यक्षरित्या मूक संमतीच्याच भूमिकेत दिसतात. नैतिकतेचा ऱ्हास झालेले राजकरण सगळ्यानी अंगिकृत केले आहे. मुस्लिम युवकांनी काही गोष्टी हिकमत आणि सब्रने घ्याव्यात. यासाठी मुस्लिम समाजातील जाणकारांनी युवकांचे मानसशास्त्रीय समुपदेशन करावे.

### २७ वर्षाच्या नात्याला

केला आहे. या रिलेशनशिपचा किती पिरेड आहे. हे गृहीत धरतात. २७ वर्षाचा पिरेड त्यातून दोन मुल जन्माला, त्यांचं वय १८, १९ वर्षे हे लिव्ह इन रिलेशनशिप म्हणता येणार नाही. दोन तीन वर्षाचा लिव्ह इन पिरेड असू शकतो, असंही वकील म्हणाले.

ते एक राजकीय संघटना चालवत आहेत, आर्थिक परिस्थिती त्यांची चांगली आहे. २९ तारखेला कोर्ट फायनल निकाल देणार आहे, असंही वकील म्हणाले. दरम्यान, यावर करुणा शर्मा यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. करुणा शर्मा म्हणाल्या, आम्ही १५ लाखांची पोटगीची मागणी केली आहे. कमीत कमी आम्हाला महिना नऊ लाख रुपये पाहिजे आहे. मुंडे यांनी यांनी या सुनावणीला आव्हान दिले आहे. २९ मार्च रोजी यावर सुनावणी होणार आहे.

या आधीच्या सुनावणीत काय झाले होते?

करुणा शर्मा यांच्यावर प्रथमदर्शनी घरगुती हिंसाचार झाल्याचे निरीक्षण नोंदवत वांद्रे दंडाधिकारी न्यायालयाने अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांना करुणा यांना दरमहा १ लाख २५ हजार रुपये, तर त्यांच्या मुलीसाठी ७५ हजार रुपये अंतरिम देखभाल खर्च म्हणून देण्याचे निर्देश दिले होते. तर मुलगा २१ वर्षांचा असल्याने न्यायालयाने त्याच्यासाठी देखभालीचा खर्च देण्यास नकार दिला.

### बीडच्या जाळपोळीत

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे कार्यालय, गाडी आणि घरही जाळले. तेथे आ. संदीप क्षीरसागर, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, डॉ. भारतभूषण क्षीरसागर, डॉ. योगेश क्षीरसागर हे सर्व एकाच छताखाली राहतात. सायंकाळी शिवसेना माजी जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, दिलीप गोरे यांची कार्यालये पेटविली. रात्री सात वाजता या जमावाने आ. विजयसिंह पंडित यांच्या घरांकडे जाऊन दगडफेक करीत बाहेर जाळपोळ केली. पोलिसांनी वेळीच धाव घेत अश्रुधुराचा वापर केल्याने जमाव पांगला. त्यानंतर जाळपोळीला ’ब्रेक’ लागला होता. दरम्यान, पोलिस निरीक्षक मुकुंद कुलकर्णी हे जखमीही झाले होते.

बीड । दिव्य न्युज

गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे 140 गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत उपोषण सुरू केले आहे. उपोषण सुरू होऊन पंधरा दिवस झाले, मात्र शासनाच्या वतीने अद्यापही जिल्हाधिकारी व कार्यकारी अभियंता यांनी दखल न घेतल्याने सोमवारपासून उपोषणकर्त्या शेतकऱ्यांनी आता जलत्याग आंदोलन सुरू केले आहे. पाणी न पिल्याने अशक्तपणा येऊन रक्तदाब कमी झाला. त्यामुळे उपोषणस्थळी डॉक्टरांनी सलाईन दिले आहे. दादा 140 गावचे शेतकरी सारणावर गेल्याशिवाय तुमचे जिल्हा प्रशासन दखल घेणार नाही का? मागील पंधरा दिवसांपासून उपोषण सुरू असून जिल्हाधिकारी या ठिकाणी का फिरकले नाहीत, असा संतप्त सवालही उपोषणकर्त्या शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

# दादा! १४० गावचे उपोषणकर्ते शेतकरी सरणावर गेल्याशिवाय जिल्हा प्रशासन दखल घेणार नाही का?



## अजित पवार पालकमंत्री असलेल्या बीड जिल्ह्यातील शेतकरी भोगताहेत मरण यातना!

## गेल्या पंधरा दिवसांपासून सिरसमार्ग येथे १४० गावचे शेतकरी उपोषण करताहेत तरीही जिल्हाधिकाऱ्यांना दखल घ्यावी वाटत नाही!



### दोन दिवसांपासून सुरू केले जलत्याग आंदोलन

शिरूर निमगाव ते माजलगाव पर्यंतच्या सिंदफणाकाठच्या 140 गावातील शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन हक्काच्या पाण्यासाठी मागील पंधरा दिवसांपासून लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. सिंदफणा नदीमध्ये बारमाही पाणी नसल्याने शेतकऱ्यांना अनेक संकटाना सामोरे जावे लागते. गेल्या दोन दिवसांपासून उपोषणकर्त्यांनी जलत्याग केले आहे. शरिरातील पाणी कमी झाल्याने उपोषणकर्ते देविदास चव्हाण यांना डॉ. सुरज बनसोडे यांनी उपोषणस्थळी सलाईन लावले. यासह ईतर उपोषणकर्ते यांचीही तपासणी करून औषधोपचार केले जात आहेत.

### या आहेत प्रमुख मागण्या!

- शासनाने सिंदफणा नदीवर बंधारे बांधावेत
- जायकवाडीच्या उजव्या कालव्यातून उपकालवा करावा
- जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा नदी पात्रात सोडावे
- नदीजोड प्रकल्प गतीने राबविण्यात यावा
- मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेत कृषी व उद्योगांना पाणी द्यावे.




### यांची होती उपस्थिती

यावेळी भाऊसाहेब जरांगे पाटील, राजसाहेब काका पवळ, समन्वयक दिनेश गुळवे, महादेव रडे, विजयकुमार करपे, चंद्रकांत मुळे. गणेश कारंडे, विठ्ठल तांबारे, शहादेव परदेशी, कृष्णा टाकसाळ, तुकाराम टाकसाळ, बाबा पवळ, गणेश महाराज कोळेकर, संतोष कारंडे, संतोष रडे, पांडुरंग पन्हाळे मामा, ओंकार चिखले, रामप्रसाद देवकर. निवृत्ती कोळेकर आदी उपस्थित होते.

### शासनाने दखल घ्यावी!

शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी संभाजीनगर येथे उपोषण केले होते. मात्र त्यानंतर शासनाने काही कार्यवाही केली नाही. त्यामुळे आता पुन्हा उपोषण सुरू केले आहे, वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांनी याची अत्यंत गंभीर दखल घेवून शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी विनाविलंब त्यांना मिळवून द्यावे!

– शेतकरी महादेव रडे, देविदास चव्हाण

### योजनांसाठी भरीव निधी मंजूर करा!

अर्थसंकल्पात मराठवाड्यावर सिंचनाबाबत मोठा अन्याय झाला आहे. अर्थसंकल्पिय अधिवेशन सुरूच असल्याने सिंचनासाठी निधी मंजूर करावा. एकूणच शेतकऱ्यांच्या भवितव्यासाठी आणि हा भाग सुजलाम सुफलाम करण्यासाठी विविध योजनांसाठी भरीव निधी मंजूर करण्यात यावा.

–समन्वयक दिनेश गुळवे

### माजी मंत्री धनंजय मुंडेंनी घेतली सिरसमार्ग उपोषणाची दखल

या उपोषणाची वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांनी अद्याप कोणीच दखल घेतली नसले तरी माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी गुरुवारी सकाळी फोन करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. जायकवाडी धरणाची पाणी सिंदफणा नदीपात्रात सोडावे, सिंदफणा नदीवर साखळी बंधारे बांधावे, नदी जोड प्रकल्प, मराठवाडा वॉटर ग्रेड योजना करावी आदीसाठी हे उपोषण आहे. सदरील उपोषणकर्त्यांशी संवाद करून धनंजय मुंडे यांनी आपण जिल्हा प्रशासनाला बोलतो असे म्हणाले. तसेच उपोषणकर्त्यांना तब्येतीची काळजी घेण्याचे सांगून चिंता व्यक्त केली.

# आग ओकणाऱ्या उन्हात रोजे ठेवून लोकांना गोड रसदार फळे उपलब्ध करून देणारे रईस बागवान



बीड । दिव्य न्युज

सध्या कडक उन्हाळा सुरू आहे. दिवसागणिक उन्हाचा पारा वर चढत आहे. अशा वातावरणात सध्या इस्लाम धर्माचा पवित्र रमज़ान महिना सुरू आहे. मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने रोजे ठेवत आहेत. शहरातील नगर नाका भागात गेल्या ३५ वर्षांपासून ग्राहकांना विविध फळे उपलब्ध करून देणारे रईस बागवान आणि त्यांचा चमू या कडाक्याच्या उन्हात सुद्धा रोजे ठेवून गोड आणि रसदार फळे उपलब्ध करून देत आहे.

नगर नाका परिसरात रईस बागवान यांची फळाची दुकान म्हटले की, ग्राहकांना खात्रीशीर गोड आणि रसदार फळे मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणून सुपरिचित आहे. गेल्या ३५ वर्षांपासून ते आपल्या पदरात दोन पैसे कमी नफा मिळाला तरी चालेल मात्र ग्राहकांना चांगली दर्जेदार गोड फळे मिळावी यासाठी ते नेहमीच प्रयत्नरत असतात. मग ऋतू आणि वातावरण कोणताही असो. हिवाळा पावसाळा किंवा उन्हाळा याची तमा न बाळगता ते रियाज़ बागवान, लारेब बागवान, आरेफ़ बागवान, अख़ील बागवान, मुश्रफ़ बागवान, इरफ़ान बागवान या आपल्या चमूसह चांगल्या दर्जेदार फळासह सेवा देण्यास नेहमीच तत्पर असतात. अशाच प्रकारे कडकडत्या उन्हात पवित्र रमजान महिन्याचे रोजे ठेवून दिवसभर उन्हापासून बचाव करताना छत्र्या लावून फळे विकतात. दर्जेदार फळांमुळे त्यांच्याकडे ग्राहक लांब लांबून येऊन फळे घेऊन जातात. त्यातही उन्हाळ्याच्या हंगामात त्यांच्याकडे लालभडक गोड टरबूज आणि खरबूज घेऊन जाण्यासाठी ग्राहकांची रीघ लागलेली असते. ही फळे खाल्ल्यानंतर जसे ग्राहकांना चांगले फळ खाल्ल्याचे समाधान मिळते तसेच आपल्या भरवशावर लांब लांबून येऊन फळे घेऊन जाणाऱ्या ग्राहकाला समाधान मिळत असल्याचे पाहून आपल्यालाही समाधान मिळते असे रईस बागवान म्हणतात.

# सोशल मिडीयावर कुठल्याही प्रकारची वादग्रस्त पोस्ट टाकू नये

## –पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांचे आवाहन



परभणी । दिव्य न्युज

जिल्ह्यातील शांतता अबाधित ठेवणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि सोशल मिडीयावर कुठल्याही प्रकारची वादग्रस्त पोस्ट टाकू नये. असे आवाहन पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी जिल्हा पोलीस दलाच्या वतीने सर्व नागरिकांना केले आहे.

नागपुरात घडलेल्या घटनांचे कोणतेही वादग्रस्त व्हिडीओ व्हायरल करू नये. पोलीस ठाण्यात जमाव जमवून येऊ नये. ज्याची काही तक्रार असल्यास दोन व्यक्तींनी येऊन तक्रार द्यावी, बेकायदेशीर जमाव जमविण्याचे टाळावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. परभणी सायबर पोलिसांची सोशल मिडीयावर करडी नजर असून आक्षेपार्ह पोस्ट आढळून आल्यास कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी दिला आहे.

# केरसुनीच्या व्यवसायातून मुलाला घडवले

## नाकलगाव चा संजय गायकवाड महाराष्ट्र सुरक्षा दलात दाखल

दिंद्रुड। दिव्य न्युज : सय्यद अखिल

आई-वडीलांनी गावोगावी व रानोमाळ भटकून केरसुनी (झाडू) बनवण्यासाठी लागणारी झाडी (सिंधीची पनाळी) तोडून बनवलेल्या झाडु - दुरडीच्या विक्रीतुन मिळणाऱ्या मोजक्या पैशातून मुलगा मोठा अधिकारी होण्याचे बघितलेले स्वप्न मुलाने पुर्ण केले. महाराष्ट्र सुरक्षा बलात नाखलगाव चा संजय दाखल होत आहे. सर्वसामान्य गायकवाड कुटुंबातील संजयच्या या यशाचं सर्वत्र कौतुक होत आहे.

माजलगाव तालुक्यातील नाखलगाव येथील मसाजी गायकवाड यांचा केरसुणी व दुरडी बनवण्याचा परंपरागत व्यवसाय आहे. अतिशय हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगणाऱ्या गायकवाड यांना आपल्या मुलाने सरकारी अधिकारी व्हावे अशी इच्छा होती. आई जाईबाई व वडील मसाजी गायकवाड यांनी रानावनात भटकत झाडू व दुरडी साठी लागणारी सिंधीची झाडी गोळा करून व अपार कष्ट करून विक्री केलेल्या झाडू - दुरडी च्या विक्रीतून मिळालेल्या पैशातून संजय या मुलाचे संगोपन केले. गतवर्षी धुळे येथील एम एस एफ कॅम्प मध्ये सरावासाठी संजय दाखल झाला होता. त्याची ट्रेनिंग आता पूर्ण झाली आहे. मुंबई येथील महाराष्ट्र सुरक्षा बलात तो दाखल होणार आहे. यासाठी संजयने गेल्या पाच वर्षांपासून प्रचंड मेहनत घेतली. अंग मेहनती सोबत अभ्यास करण्यासाठी ग्रंथालयात १८ तास अभ्यास केला. वेळप्रसंगी ग्रंथालयात झोपल्याचे तो सांगतो. आपल्या आई वडिलांनी केलेल्या कष्टाचे फळ मला मिळाले असून भविष्यात गोरगरीब कुटुंबातील तरुणांनी राजकारणातील कार्यकर्ते होण्यापेक्षा आई-वडिलांचे कष्ट पाहून सुकर भविष्यासाठी योग्य तो निर्णय घेत परिश्रम करावे असं संजय सांगतो.

१.आम्ही संजय साठी घेतलेल्या अपार कष्टाचे फळ आम्हाला मिळाले आहे. आमच्या कष्टाचे चिज संजयने केले आहे. आता भविष्यात आमच्या मनातील त्याच्याबद्दलची काळजी मिटली आहे. त्याने सुखात जगावे,आमचा परंपरागत असलेल्या व्यवसायात अपार कष्ट आहेत. रानावनात व दारोदार भटकंती करण्याची वेळ माझ्या मुलावर येणार नाही यामुळे आम्ही आनंदी आहोत.
– मसाजी गायकवाड

२. आजकालची तरुणाई मोबाईलच्या पुर्णतः आहारी गेली आहे. आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याऐवजी रील स्टार्स होण्यात त्यांना रस आहे. मात्र संजय गायकवाड ने घेतलेली मेहनत व अपार कष्ट, त्याच्या आई - वडिलांनी दिलेली साथ ही सर्वसामान्य कुटुंबातील सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे.
– बाबा कांबळे,सामाजिक कार्यकर्ते दिंद्रुड



# अखेर सायमाला आधार मिळाला

# पोस्टमास्तर विनोद गर्जे यांची शिष्टाई फळाला



**काम म्हणजे माझ्यासाठी पर्वणी, कायमच सेवा देण्याचा प्रयत्न –विनोद गर्जे**

मी स्वतः पाटोदा तालुक्यातील महासांगवी गावचा असुन पाटोदा शहरातील तथा तालुक्यातील ग्राहकाचे काम म्हणजे माझ्यासाठी पर्वणी समजून कायमच सेवा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे आणि भविष्यातही करत राहणार. सायमा हिला काहीतरी मदत करू शकलो हे माझं भाग्य. ईश्वर, अल्लाहने त्यांना लवकर त्यांच्या पायावर उभं करावं अशी प्रार्थना करतो. – विनोद गर्जे (पोस्टमास्तर, पाटोदा)

पाटोदा । दिव्य न्युज

सध्याच्या युगात एखाद्याचा आधार नंबर नसणे म्हणजे त्याच्या अस्तित्वावरच प्रश्न चिन्ह उभे राहते. असंच काहीसं गेल्या ९ वर्षांपासून उपचाराअभावी अपंगत्व आलेल्या सायमा सोबत घडलं होतं परंतु पाटोदा पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्तर विनोद गर्जे यांची शिष्टाई फळाला आली. सायमाला आधार कार्ड नंबर मिळाला.

अनवधनाने घडलेल्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या सायमाला योग्य उपचार न मिळाल्याने अंपगत्व आले. गेल्या ९ वर्षांपासून ती अंथरुणावर पडुन होती. ही गंभीर बाब जेव्हा सय्यद शफाओद्दीन, पत्रकार हमीदखान पठाण, जावेद शेख यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी प्रसिद्धी माध्यमाद्वारे आर्थिक मदतीसाठी लोकसहभागाचे आवाहन केले होते. त्यामुळे अनेक दानशूरांनी स्वतःहुन पुढे येत सढळ हाताने मदत सुरू केली. ती अविरतपणे सुरू असुन त्यातुनच सायमावर उपचार सुरू आहेत. मात्र शासकीय पातळीवर तिचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी महत्वपूर्ण मानले जाणारे आधार कार्ड नसल्याने मोठी अडचण येत होती. तिच्या कुटुंबियांनी अनेकदा आधार कार्ड काढण्याचा प्रयत्न केला होता मात्र अपयश येत होते. या गंभीर घटनेकडे पाटोदा पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्तर विनोद गर्जे यांचे सय्यद शफाओद्दीन व पत्रकार हमीदखान पठाण, जावेद शेख यांनी लक्ष वेधले. त्यांनी आधार कार्ड का रिजेक्ट होते याची इत्यंभुत माहिती घेत आठ दिवस बीड, औरंगाबाद येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधत सायमाचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी स्वतः जबाबदारी घेत नगरपंचायत, तहसील कार्यालय तसेच शाळेतील महत्त्वाची कागदपत्रांची जुळवाजुळव करून दि.२७ फेब्रुवारीला आधार कार्ड ऑनलाइन केले होते. या दरम्यान आधार कार्ड रिजेक्ट होऊ नये यासाठी वरिष्ठांशी वेळोवेळी पाठपुरावा केला. मात्र १२ दिवसाचा कालावधी लोटला तरी आधार कार्ड वेटींग मध्येच का आहे? याचा अंदाज येत नसल्याने औरंगाबाद येथील कार्यालयाचा वेळ मागुन घेत सायमालाच तिथे घेऊन जाण्याची योजना आखली। मात्र दि.१५ मार्च रोजी सायमाचा आधार कार्ड ऑनलाइन झाल्याचा मेसेज आला आणि सर्वांनी सुटेकेचा निश्वास सोडला. खऱ्या अर्थाने पोस्टमास्तर विनोद गर्जे यांचा पाठपुरावा व शिष्टाई फळाला आली. याच संदर्भात दि.१९ मार्च बुधवार रोजी पोस्ट ऑफिस कार्यालयाच्या वतीने सायमाला आधार कार्ड देण्यात आले. यावेळी सायमा व सय्यद शफाओद्दीन, पत्रकार जावेद शेख, हमीदखान पठाण, सचिन शिंदे आदींच्या वतीने पोस्टमास्तर विनोद गर्जे, काकडे, तावरे, सचिन कांबळे, प्रसाद मोराळे, कु.अंकिता सावंत, बेद्रे तथा इतर कार्यालयीन सहकाऱ्यांचा शाल, पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# दिव्य वार्ता

शुक्रवार २१ मार्च २०२५ | ४


## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या बीड तालुका उपाध्यक्षपदी इम्रान शाह

बीड । दिव्य न्युज

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड तालुका उपाध्यक्षपदी इम्रान शाह यांची निवड करण्यात आली आहे. पत्रकारितेसोबत सामाजिक कामातही पुढे असलेल्या इमरान शाह यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईची बीड जिल्हा तसेच तालुका कार्यकारिणी प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांच्या मान्यतेने राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांच्या मान्यतेने जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे, शेख रिजवान यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष धनंजय गुंदेकर यांनी बीड तालुका उपाध्यक्षपदी इमरान शाह यांची निवड घोषित केली. इम्रान शाह हे पत्रकारिते सोबतच सामाजिक आणि समाजाभीमुख कामे करतात. प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, राज्य समन्वयक संतोष मानुरकर, जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे, शेख रिजवान तसेच जिल्हा व तालुका कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांनी निवडीबद्दल इमरान शहा यांचे अभिनंदन करत पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# वडिलांचा दहावा(फातिहा)सुरू असताना पोलीस भावांना उचलून घेऊन गेले

## दगडफेक आणि जाळपोळ झाल्यानंतर पोलिसांनी भालदारपुरा परिसरात कोम्बिंग ऑपरेशन राबवलं








नागपूर । दिव्य न्युज : – दगडफेक आणि जाळपोळ झाल्यानंतर पोलिसांनी भालदारपुरा परिसरात कोम्बिंग ऑपरेशन राबवलं. तिथून काही जणांना ताब्यात घेतलं. तसेच या भागात अश्रूधुराचे नळकांडे फोडले. कोम्बिंग ऑपरेशन तसेच पोलीस बळाचा वापर, यावर बीबीसी मराठीने पोलिसांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. लहान बाळांना सक्करदरा इथल्या खडक्कार रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे त्या मुलांचे आजोबा मोहम्मद इकबाल शेख सांगतात. ते म्हणतात, इथं अचानक दगडफेक सुरू झाली. त्यानंतर पोलिसांनी इथं अश्रुधुराचे नळकांडे फोडले. माझं सगळं कुटुंब घरातच होतं. अश्रूधुरांच्या नळकांड्यामुळे आमच्या घरातल्या लहान मुलांना श्वास घ्यायला त्रास व्हायला लागला. एकाच्या तोंडातून फेस बाहेर येत होता. रुग्णवाहिका बोलावली आणि त्यांना दवाखान्यात नेलं. अशा परिस्थिती घरापासून रुग्णवाहिकेपर्यंत नेण्यासाठी पोलिसांनी आम्हाला मदतही केली, असं पुढं ते म्हणाले. आता या मुलांची तब्येत ठीकअसून त्यांना एक दिवसात रुग्णालयातून डिस्चार्ज दिला जाईल असं डॉक्टरांनी सांगितलं.

### आमच्या वडिलांची शोकसभा सुरू होती हा आमचा दोष होता का?

याच भालदारपुरा परिसरात राहणाऱ्या २५ वर्षीय मुसराज शेख यांनी वडिलांची शोकसभा सुरू असताना पोलिसांनी भावांना जबरदस्तीनं उचलून नेल्याचा आरोप केला.

त्या म्हणतात, काल इथं हिंसा सुरू होती. माझ्या घरी माझ्या वडिलांचा काही दिवसांआधी मृत्यू झाला. आम्ही त्यांच्या शोकसभेसाठी एकत्र जमलो होतो. माझी आई, मावशी, त्यांची मुलं-मुली आणि जावई लोक असे सगळे आमच्या घरी आले होते. वडिलांच्या दहावा दिवस म्हणजे फातिहा झाली.

पुढं त्या म्हणाल्या, त्यानंतर सगळेजण घरातच होते. कोणीच कुठे गेलं नव्हतं. माझा लहान भाऊ २४ वर्षांचा आहे, तो कधीच कुठेच जात नाही. घरातच राहतो. सगळे लोक इकडे येत होते. त्यामुळे आम्ही घाबरून दरवाजे लावून घरात लपलो होतो. पण, पोलीस आमच्या घरात घुसले, दरवाजे आणि खिडक्या तोडल्या. आजूबाजूचे लोक जसे बघत होते तसेच त्यांचे भाऊ बाल्कनीत उभं राहून ते सगळं बघत होते. ते सगळे जेवणाची वाट बघत होते. जेवण झालं की ते आपआपल्या घरी जाणार होते, असं त्या म्हणाल्या. पुढं त्या म्हणाल्या, आमच्या घरात आमच्या वडिलांचा मृत्यू झाला आणि शोकसभा सुरू आहे असं सांगितलं तरी पोलिसांनी ऐकलं नाही. जबरदस्ती आमच्या घरातल्या सगळ्या पुरुषांना घेऊन गेले. माझा लहान भाऊ जो नेहमी घरातच पडलेला असतो त्याचा डोळा फोडला तर शासकीय रुग्णालयात उपचार घेतोय. त्याच्या तब्येतीचं आम्हाला काहीच अपडेट नाही. माझ्या मावशीचा मुलगा पण हॉस्पीटलमध्ये आहे. त्यांचा काही दोष नसताना कसे काय घेऊन गेलेत? आमच्या घरात आमच्या वडिलांची शोकसभा सुरू होती हा आमचा दोष होता का? असा प्रश्न त्या उपस्थित करतात.

### परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांचं कोम्बिंग ऑपरेशन

नागपुरात सोमवारी (१७ मार्च) रात्री दोन गटातील वादातून हिंसाचाराची घटना घडली. शहरातील महाल भागात वाहनांची जाळपोळ आणि दगडफेकीची घटना घडली. पोलिसांनी बळाचा वापर करून परिस्थिती नियंत्रणात आणली असून शांतता राखण्याचं आवाहन सर्वसामान्यांना केलं आहे. १८ मार्चला सकाळी मिळालेल्या ताज्या माहितीनुसार, नागपूर पोलिसांनी रात्री उशिरा एक वाजेपर्यंत चिटणीस पार्क परिसरात कोम्बिंग ऑपरेशन राबवलं. यात जवळपास २० संशयितांना ताब्यात घेतलं असून, सध्या परिसरात जमावबंदी लागू करण्यात आलीय.

### 'गैरसमजामुळे घडली घटना'

नागपूर झालेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर नागपूरचे पोलीस उपायुक्त (डीसीपी) अर्चित चांडक यांनी माहिती दिली आहे. अर्चित चांडक म्हणाले की, ही घटना गैरसमज किंवा चुकीच्या संवादामुळे घडली. सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे. आमचं इथलं पोलीस दल भक्कम आहे. माझं सर्वांना आवाहन आहे की घराबाहेर पडू नका किंवा दगडफेक करू नका. दगडफेक होत असल्यामुळे आम्हाला बळाचा वापर करावा लागला. तसंच अश्रूधुराचा देखील वापर करावा लागला.

कोम्बिंग ऑपरेशनच्या परिसरात लोकांनी केलेल्या आरोपांबद्दल त्या बंदोबस्ताच्या ठिकाणी उपस्थित असलेल्या एका पोलीस उपायुक्तांसोबत बोललो. पण, त्यांनी बोलण्यास नकार दिल्याचं त्यांनी सांगितलं. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना शांततेचं आवाहन केलं आहे.

फडणवीस म्हणाले, मी सातत्याने पोलीस प्रशासनाच्या संपर्कात आहे. नागपूर शांतताप्रिय आणि एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणारं शहर आहे. हीच नागपूरची परंपरा आहे. अशावेळी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका आणि प्रशासनाला पूर्ण सहकार्य करा. भालदारपुरा इथल्या नागरिकांनी केलेल्या आरोपांवर नागपूरचे पोलीस आयुक्त रविंद्र सिंघल यांना प्रश्न विचारण्यात आला. यावेळी ते म्हणाले, मी याविषयी बोलू शकत नाही. दंगलीचे घटना झालेली आहे. ऑन रेकॉर्ड व्हीडिओ आहेत. असं कोणी म्हणत असेल तर त्यांना म्हणण्याचा अधिकार आहे. आम्ही आमचं काम करत आहोत. गुरुवारी २० मार्चला पोलीस आयुक्त कार्यालयात ते मध्यमांसोबत बोलत असताना त्यांनी ही प्रतिक्रिया दिली.

तर कुठल्याही निर्दोष व्यक्तीवर कारवाई करु नका असे स्पष्ट निर्देश महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांनी पोलीस विभागाला दिले आहेत. खान यांनी गुरुवारी २० मार्च रोजी पोलीस मुख्यालयात नागपूर हिंसाचाराच्या घटनेप्रकरणी पोलीस विभाग आणि जिल्हा प्रशासनासोबत आढावा बैठक घेतली.

## ऐतीहासीक स्थळे नष्ट करुन छत्रपती शिवाजी महाराजांचा ईतिहास पुसण्याचा प्रयत्न होतोय– गोरख जगदाळे

बीड । दिव्य न्युज

सध्या औरंगजेब कबरीचा विषय ऐरणीवर आला आहे. मागील काळात असाच दुसरा विषय म्हणजे प्रतापगडावरील अफजलखानाच्या कबरीचा विषयही आला होता. आता या कबरीच्या विषयाकडे पाहण्याचा अनेकांचा दुरदृष्टीकोन हा वेगवेगळा असुन शकतो. व आपापले मतप्रवाह ही विभक्त असु शकतात यात दुमत असु शकत नाही.



दुसरी गोष्ट म्हणजे महाराष्ट्र पाठ्यपुस्तक निर्मीती मंडळाकडुन अभ्यासक्रमामधुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराकृमाबद्दलचे लिखान खुप मोठ्या प्रमाणात वगळण्यात आलेले आहे. या गोष्टींकडे कोणाचेही लक्ष नाही.

प्रत्येक गोष्टीमध्ये उदाहरनार्थ रामायण, महाभारतामध्ये सुध्दा नायक- खलनायकांच्या भुमीका या आहेतच की, जर खलनायकाच्यवा भुमीका काढुन टाकल्या तर ते हे विषय परिपुर्ण होतील का ? परिस्थिती अशीच राहिली तर महाराष्ट्राच्या गृह खात्यासमोर अव्हाण उभे राहु शकते

जर या ऐतीहासीक स्थळांचे विषय समोर आले तर पोलीस खात्यासमोर मोठ्या अडचणी निर्माण होतील व मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागेल. आधिच पोलसांसमोर खुन, दरोडे, स्त्रीयांचे विनयभंग, बलात्कार अशे प्रश्न तोड वासुन उभे आहेत. आता आपले महाराष्ट्र सरकार हे धर्मनिरपेक्षतेच्या भुमीकेतुन वाटचाल करत आहे. संबंधीत संघटनांनी सरकारला अडचणीत आणु नये ही माझी रास्त अपेक्षा आहे. ज्यांना कोणाला राजकारण करावयाचे आहे त्यांनी वरील प्रश्नांवर आवाज उठवुन आपल्या संघटनांचे योगदान द्यावे परंतु सामाजिक स्वास्थ्य बीघडवीण्याचे काम करु नये असे मला वाटते. असे प्रसिद्ध पत्रकात गोरख जगदाळे यांनी म्हटले आहे.

## खुनातील आरोपींना जेरबंद करा गोसावी समाज परिषदेचे आंदोलन



बीड (दिव्य न्युज)

धाराशिव जिल्ह्यातील दुधोडी येथील एकाचा क्रुर पध्दतीने खून करण्यात आला आहे. सदरील आरोपींना अटक करून त्यांच्या विरोधात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावे व मयताच्या कुटूंयिास मदत द्यावी या मागणीसाठी दशनाम गोसावी समाज परिषदेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येत आहे.ङ्गमाऊली ाबासाहे गिरी (रा.दुधोडी ता.भूम जि.धाराशिव) या क्रुर पध्दतीने मारहाण करून त्याचा निघृणपणे खून करण्यात आला. या प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्या विरोधात मकोका नुसार कारवाई करण्यात यावी व मयताच्या कुटूंबियास शासनाकडून आर्थिक मदत देण्यात यावी यामागणीसाठी दशनाम गोसावी समाज परिषदेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.



माजलगाव : उवेस अबरान कुरेशी यांनी वयाच्या ७ व्या वर्षी आपल्या आयुष्यातला पहिला रोजा पुर्ण केला केल्याबद्दल आई वडील, नातेवाईक, मित्र परिवारांकडुन हार्दिक शुभेच्छा देऊन कौतुक होत आहे.

## चऱ्हाटा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वीजजोडणीसाठी 10 लक्ष रुपयांचा निधी

## सीईओ आदित्य जीवनेकडुन मंजूर ; जलसमाधी आंदोलनाचे यश




बीड । दिव्य न्युज

बीड तालुक्यातील सराटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र गेल्या आठ वर्षापासून पाच कोटी रुपये खर्चून बांधण्यात आले असून सुरुवातीपासून वीज जोडणी अभावी प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत शोभेची वस्तू बनली असून प्राथमिक आरोग्य केंद्रात सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे वीजजोडणी साठी निधी देण्यात यावा या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वात दि.१४ आक्टोबर रोजी च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील साठवण तलावात जलसमाधी आंदोलन करून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आदित्य जीवने यांची प्रत्यक्ष भेट घेत निधीची मागणी केली होती.तेव्हा गांभीर्याने याचा विचार करून लवकरच निधीची उपलब्धता करून देण्यात येईल असे आश्वासन दिले होते. त्याचीच दखल घेत अखेर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आदित्य जीवने यांनी च-हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र ईमारत व कर्मचारी निवासस्थान यांच्या विद्युतीकरणा साठी विद्युत रोहित्र ( डी .पी.) बसविणे कामासाठी जिल्हा वार्षिक योजना सन२०२४- २०२५ अंतर्गत १० लाख रुपयांच्या निधीची तरतूद अग्नि सुरक्षा यंत्रणा खरेदी , दुरूस्ती, विस्तारीकरण व देखभाल , प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र दुरुस्ती व परीक्षण ,पीट बरीयल बांधकाम (लेखाशिर्ष -२२१०श्र ०९४-३१) अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या तरतुदींच्या अंतर्गत करण्यात आली आले.त्यामुळे अखेर वीज जोडणी नंतर रूग्णांची हेळसांड थांबणार असुन बीडला उपचारासाठी लागणार आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार नाही याबद्दल आंदोलनकर्ते व ग्रामस्थांनी सीईओ जिप आदित्य जीवने आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.ऊल्हास गंडाळ यांचे आभार मानले आहेत.

**वीजजोडणी अभावी अधिकारी मुख्यालयी थांबत नाहीत; शस्त्रक्रिया, प्रसुती,आंतरविभाग आरोग्य सेवा बंद**

च-हाटा परीसरातील ग्रामस्थांना आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी ५ कोटी रुपये खर्चून ८ वर्षांपूर्वी आरोग्य केंद्र आणि अधिकारी,कर्मचारी निवासस्थाने यासाठी सुसज्ज इमारत बांधण्यात आली होती. मात्र यासाठी सुरूवातीपासूनच वीज जोडणी करण्यात आलीच नाही. त्यामुळे अधिकारी आणि कर्मचारी मुख्यालयी रहात नसल्याने रूग्णांना उपचारासाठी बीडला जावे लागते.वीज जोडणी अभावी प्रसुती, शस्त्रक्रिया,आंतररुग्ण विभाग या आरोग्य सुविधा मिळत नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्रात असुविधा असल्याने रूग्णांची हेळसांड होत होती. त्यामुळे डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या सह च-हाटा येथील शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार,बप्पासाहेब पवार, मनोज तांदळे, सुभाष बांगर, संपत नागरगोजे, सुर्यकांत नागरगोजे, हरिश्चंद्र जाधव,भगिरथ उबाळे आदी ग्रामस्थांनी जलसमाधी आंदोलनात भाग घेतला होता.




बीड: रमजानचे उपवास सुरू आहेत. सायंकाळी उपवास सोडण्यासाठी लागणारे पदार्थ बाजारात विक्रीसाठी येत असून खरेदीसाठी मोठी गर्दी होत आहे.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०